महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ १६ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २०१ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# एक्झिट पोलनुसार भाजपाच मोठा भाऊ

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १५**

**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेच्या 227 जागांसाठी झालेल्या मतदानानंतर JVC ने जाहीर केलेल्या एक्झिट पोलनुसार, मुंबईत महायुती (भाजप आणि शिवसेना शिंदे गट) विजयाचा मोठा झेंडा फडकवताना दिसत आहे. या सर्वेक्षणातील अंदाजानुसार, महायुतीला तब्बल 137 ते 151 जागा मिळण्याची शक्यता आहे, जी बहुमतासाठी आवश्यक असलेल्या 114 च्या आकड्यापेक्षा खूप जास्त आहे. दुसरीकडे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट, मनसे आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांची युती दुसऱ्या क्रमांकावर राहण्याचा अंदाज आहे. या युतीला 59 जागा मिळतील, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

तथापी, काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांना या निवडणुकीत फारसा प्रभाव पाडता आलेला दिसत नाही. त्यांना केवळ 14 टक्के मते आणि 23 जागा मिळण्याचा अंदाज आहे. उर्वरित 06 जागा आणि 7 टक्के मते इतर छोटे पक्ष किंवा अपक्ष उमेदवारांच्या पदरात पडण्याची शक्यता आहे. या आकड्यांवरून असे स्पष्ट होत आहे की, मुंबईत सलग 25 वर्षे सत्तेत असलेल्या ठाकरेंच्या शिवसेनेला यंदा मोठा धक्का बसू शकतो. तसेच मुंबईत महायुती ऐतिहासिक सत्तापालट करण्याच्या उंबरठ्यावर आहे. हा केवळ एक्झिट पोलचा अंदाज असला, तरी उद्याच्या अधिकृत निकालाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिले आहे.



### ■ सत्तेचे समीकरण; 114 ची मॅजिक फिगर

**मुंबईत सत्ता स्थापन करण्यासाठी कोणत्याही पक्षाला किंवा युतीला 114 नगरसेवकांचे संख्याबळ आवश्यक आहे. एक्झिट पोलनुसार महायुती हा आकडा सहज पार करताना दिसत आहे. 2017 मध्ये भाजप 82 आणि शिवसेनेने 84 जागा जिंकल्या होत्या, मात्र यंदा भाजपने शिंदे गटासोबत युती केली आहे.**

**तब्बल 20 वर्षांनंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकाच युतीत (मराठी अस्मितेच्या मुद्द्यावर) लढले. या युतीचा फायदा ठाकरे गटाला झाला असला तरी, भाजपच्या सूक्ष्म नियोजनासमोर ही संख्या विजयासाठी पुरेशी ठरताना दिसत नाही. 61 वर्षांवरील मतदारांनी ठाकरेंना पसंती दिली असली, तरी तरुण मतदारांचा ओघ भाजपकडे झुकल्याचे या सर्वेक्षणात म्हटले आहे.**

## महापालिकांच्या मत मोजणीसाठी प्रशासन सज्ज

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १५**

राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी आज मतदान प्रक्रिया यशस्वीपणे पार पडली. किरकोळ अपवाद वगळता, सर्वच ठिकाणी शांततेत मतदान झाले आणि मतदारांनी उत्साहाने सहभागी होऊन लोकशाहीचा उत्सव साजरा केला.

मतदान पूर्ण झाल्यानंतर, मतपेट्या स्ट्रॉंग रूममध्ये सुरक्षितपणे जमा करण्यात आल्या आहेत. स्ट्रॉंग रूमच्या बाहेर कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात केला गेला असून, मतदान सुरक्षा आणि शांततेची पूर्ण खबरदारी घेतली गेली आहे. एक्झिट पोलच्या अंदाजानुसार, एकदोन महापालिका वगळता सर्वच महानगरपालिकांमध्ये भाजपला स्पष्ट बहुमत मिळण्याची शक्यता दिसत आहे. त्यामुळे, आज होणाऱ्या मतमोजणीकडे राज्याचे लक्ष लागून राहिले आहे. प्रशासनाकडून मतमोजणीसाठी सर्व तयारी पूर्ण करण्यात आल्या असून, कर्मचाऱ्यांना आवश्यक सामग्री, यंत्रसामग्री आणि सुरक्षा उपाययोजना यांची तपासणी करून अंतिम तयारी पूर्ण झाली आहे.

मतपेट्यांची वाहतूक, स्ट्रॉंग रूमचे संरक्षण, तसेच मतमोजणी प्रक्रियेत कोणत्याही गडबडीची शक्यता टाळण्यासाठी प्रशासन कडक नियमांचे पालन करणार आहे. या पार्श्वभूमीवर, राज्यातील जनता आणि राजकीय पक्ष आज होणाऱ्या मतमोजणीचे निकाल पाहण्यासाठी उत्सुक आहेत. या निकालांवर पुढील सत्तेचे समीकरण ठरू शकते, ज्यामुळे महाराष्ट्रातील राजकारणात मोठा बदल अपेक्षित आहे.



## एक्झिट पोलनुसार ठाण्यात शिंदे गटाचे वर्चस्व

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १५**

**ठाणे :** महाराष्ट्रात गुरुवार, १५ जानेवारी रोजी तब्बल २९ महापालिकांसाठी मतदान पार पडलं. यापैकी मुंबई नंतर सर्वात चर्चेत असणारी महापालिका ठाणे, जवळपास ९ वर्षांनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सहभागी झाली. ठाण्यातील मतदारांनी गुरुवारी मतदानासाठी बाहेर पडून लोकशाहीचा उत्सव साजरा केला.

आता, शुक्रवार, १६ जानेवारी रोजी इतर महापालिकांप्रमाणे ठाणे महापालिकेचे निकाल सुद्धा जाहीर होतील. मतदानानंतर समोर येणाऱ्या आकडेवारीनुसार, ठाण्यात शिवसेना आणि भाजप युतीला मतदारांचा सर्वाधिक पाठिंबा मिळण्याची शक्यता आहे. एवढंच नाही, तर शिवसेनेला ठाण्यात कधीही न मिळालेलं अभूतपूर्व यश मिळण्याची शक्यता विविध एक्सिट पोलमधून वर्तवण्यात आली आहे.

रूद्रा आणि जेडीएस यांच्या ठाणे महापालिका निवडणुकी संदर्भातील एक्झिट पोल समोर आले आहेत. त्यानुसार ठाण्यात एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला सर्वाधिक जागा मिळण्याची शक्यता आहे. दोन्ही एक्सिट पोलमध्ये शिवसेनेला ठाण्यात अभूतपूर्व यश मिळणार असल्याचे दिसते.

## "मीरा-भाईंदरमध्ये भाजपच्या रेकॉर्डब्रेक विजयाचा अंदाज

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १५**

**मीरा-भाईंदर :** मीरा-भाईंदरमध्ये भाजपच्या नेत्यांनी मोठे वक्तव्य केले आहे. कृपाशंकर सिंह यांनी म्हटले, "उत्तर भारतीय महापौर बसेल इतके नगरसेवक भाजप निवडून आणेल." एक्सीट पोलच्या आकडेवारीनुसार, भाजपने ही अपेक्षा पूर्ण करून मीरा-भाईंदरमध्ये रेकॉर्डब्रेक जागा जिंकल्या आहेत. यामुळे महापौरपद भाजपकडे जाण्याची शक्यता प्रबल झाली आहे.

मुंबईच्या बाजूला असलेले मीरा-भाईंदर शहर गेल्या काही वर्षांत वेगाने विकसित होत आहे. या उपनगरात सुनियोजित रस्ते, वाढती व्यावसायिक केंद्रे आणि मराठी, गुजराती, मारवाडी, मुस्लिम तसेच उत्तर भारतीय मतदार यांचा संमिश्र बहुल्य आहे. मात्र, अलीकडील काळात भाषा वादावरून शहर चर्चेत राहिले आहे.

मीरा-भाईंदरमध्ये शिंदे गटाची शिवसेना आणि भाजपने युतीसाठी उमेदवारी ठरवली होती; मात्र, नरेंद्र मेहतांचा युतीला विरोध असल्याने दोन्ही पक्ष स्वतंत्रपणे लढले. एकूण ९५ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपने ८७, शिवसेनेने ८१, ठाकरेंची शिवसेना ५६, मनसे ११, काँग्रेस ३२, अजित पवार ३३, शरद पवार १४ आणि रिपाई १ जागांवर उमेदवार उभे केले होते. एक्सीट पोलच्या अंदाजानुसार, भाजप ५० ते ५५ जागा जिंकू शकते, शिंदे गटाची शिवसेना २५ ते ३०, अजित पवारांची राष्ट्रवादी २ ते ३, काँग्रेस ८ ते १०, ठाकरेंची शिवसेना ५ ते ७, शरद पवारांची राष्ट्रवादी १ ते २, मनसे १ आणि इतर अपक्ष ३ ते ४ जागांवर विजय मिळवू शकतात.

या आकडेवारीनुसार, मीरा-भाईंदरमध्ये उत्तर भारतीय महापौर बसण्यास पुरेशी नगरसेवक संख्या भाजपकडे आहे, असे दिसत आहे.



## भाजपा प्रदेशाध्यक्षांनी बजावला मतदाचा हक्क

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली :** कल्याण डोंबिवली महापालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष तथा डोंबिवलीचे आमदार रविंद्र चव्हाण यांनी आपल्या कुटुंबियांसह डोंबिवलीतील स. वा. जोशी विद्यालयात मतदान केले. शहराच्या समग्र विकासासाठी आणि पुढील पिढीच्या उज्ज्वल भविष्यासाठी मतदानाचे कर्तव्य बजावले असून आपल्या शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी प्रत्येकाने लोकशाहीच्या या महोत्सवात सामील झाले पाहिजे असे आवाहन करत राज्यातील निवडणूक होत असलेल्या 29 महापालिकेत महायुतीचा महापौर बसणार असल्याचा विश्वास चव्हाण यांनी व्यक्त केला.

## संपादकीय

### मतदानाचा घसरता टक्का

कल्याण–डोंबिवली महानगरपालिका निवडणूक २०२६ मध्ये मतदानाचा टक्का अपेक्षेपेक्षा कमी राहिला, परंतु त्यातून काही सकारात्मक शिकवण देखील मिळाली. कमी मतदानामुळे लोकशाहीवर काही प्रमाणात परिणाम झाला, परंतु प्रशासन आणि समाजाला पुढे येऊन सुधारणा करण्याची संधी मिळाली. प्रशासनाने जर जनजागृतीसाठी प्रभावी पद्धतीने उपाययोजना केल्या असत्या, तर नागरिकांचा सहभाग अधिक वाढू शकला असता. डिजिटल माध्यमांचा वापर, सोशल मीडिया प्रचार आणि स्थानिक समुदायातील संस्थांचा समन्वय यामुळे मतदारांपर्यंत माहिती पोहोचवता आली असती आणि मतदानाचा उत्साह वाढला असता. मतदान टक्केवारी कमी राहिल्याचे चित्र सकारात्मक दृष्टीकोनातून पाहता, ते नागरिकांचा सहभाग वाढवण्याची चेतावणी ठरले. युवक, कामगार वर्ग आणि विविध समुदायांना मतदानाच्या महत्त्वाबाबत मार्गदर्शन केल्यास लोकशाही अधिक बळकट झाली असती आणि नागरिकांचा विश्वासही वाढला असता. त्याचबरोबर, पॅनल पद्धतीतील निवडणूक ही काही नवीन संकल्पनांसाठी प्रभावी ठरली. यामुळे पक्षांना संघटनात्मक बळ मिळाले आणि मतदारांना निर्णय घेण्याची संधी मिळाली. जर प्रशासन आणि समाज यांनी यामध्ये समन्वय साधला असता, तर ही पद्धत अधिक पारदर्शक आणि न्याय्य बनवता आली असती. सारांश; मतदानाचा टक्का कमी राहिला तरी तो सकारात्मक संदेश देणारा ठरला – जनजागृती, माहितीची उपलब्धता आणि नागरिकांचा सहभाग वाढवण्याची गरज अधोरेखित झाली.



## महत्त्वाचे

### व्होटर स्लिप वितरणात गोंधळ

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**दि. १५ :** ठाणे महापालिका निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेला सुरुवात झाल्यानंतर, अनेक ठाणेकरांच्या हाती अद्याप अधिकृत व्होटर स्लिप पोहोचल्या नव्हत्या. ज्या मतदारांना स्लिप मिळाल्या होत्या, त्यामध्येही मोठ्या प्रमाणावर घोळ आढळून आला होता; नाव आणि अनुक्रमांक योग्य असले तरी पत्ते चुकीचे छापले गेले होते. यामुळे मतदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आणि निवडणूक व्यवस्थेतील दोष शेवटच्या टप्प्यातही उघडकीस आला. ठाण्यातील घोडबंदर भागातील ब्रह्मांड, हिरानंदानी इस्टेट, ऋतुपार्क आणि इतर परिसरातील मतदारांच्या नावापुढे छापण्यात आलेल्या पत्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर चूक झाली होती. मतदार यादीतील नाव आणि अनुक्रमांक अचूक असले तरी पत्ता दुसऱ्या इमारतीचा किंवा वेगळ्या ठिकाणचा नमूद करण्यात आला होता. अनेक प्रकरणांमध्ये फ्लॅट क्रमांकही चुकीचा छापला गेला होता. या चुकीच्या पत्त्यांमुळे अनेक मतदारांच्या व्होटर स्लिप दुसऱ्या इमारतींमध्ये पोहोचल्या. संबंधित पत्त्यावर नाव शोधण्याचा प्रयत्न केला असता, अशी व्यक्ती त्या इमारतीत राहत नसल्याचे समोर आले. परिणामी, व्होटर स्लिप वाटप करणाऱ्यांनाही गोंधळ उडाला आणि विविध राजकीय पक्षांकडून वाटण्यात येणाऱ्या स्लिप्स चुकीच्या पत्त्यांवर पोहोचल्या.

### कल्याण-डोंबिवली उल्हासनगरात शिंदे गट ठरणार सर्वात मोठा पक्ष

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १५ :**

कल्याण-डोंबिवली महापालिकेत (एकूण १२२ वॉर्ड) एक्झिट पोलनुसार, एकनाथ शिंदे गट ५७ वॉर्डांसह सर्वात मोठा पक्ष ठरण्याच्या स्थितीत आहे. भाजप ४२ वॉर्डांसह दुसऱ्या स्थानावर आहे. तर उद्धव ठाकरे गट आणि मनसे प्रत्येकी ६ वॉर्डांवर समाधान मानतील. काँग्रेस आणि शरद पवार गटाला प्रत्येकी २ वॉर्ड, तर इतर पक्षांना ७ वॉर्ड मिळण्याचा अंदाज आहे. तर उल्हासनगर महानगरपालिकेत (एकूण ७८ वॉर्ड) एक्झिट पोलनुसार, एकनाथ शिंदे गट २९ वॉर्डांसह सर्वात मोठा पक्ष राहणार आहे. भाजप २८ वॉर्डांसह जवळपास बरोबरीवर आहे. अजित पवार गटाला ४ वॉर्ड, उद्धव ठाकरे गटाला १ वॉर्ड, मनसेला २ वॉर्ड, काँग्रेसला २ वॉर्ड तर इतरांना १२ वॉर्ड मिळण्याचा अंदाज आहे.

## कल्याणमध्ये ईव्हीएमवर उमेदवाराचे चुकीचे नाव !

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १५, कल्याण**

कल्याण–डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ अंतर्गत प्रभाग क्रमांक ३ – ड (सर्वसाधारण पुरुष) मध्ये आज मतदानाच्या पहिल्या तासात धक्कादायक प्रकार समोर आला. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि काँग्रेस आघाडीचे उमेदवार ॲड. शेखर अप्पाराव वाकोडे यांचे नाव ईव्हीएम मशीनवर 'ॲड. शेख अप्पाराव वाकोडे' असे चुकीचे दाखवले गेले, ज्यामुळे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला.

सकाळी साडेसात वाजताच्या सुमारास प्रभागातील ६३ पैकी सर्व मतदान केंद्रांवर ही त्रुटी आढळून आली. अनेक मतदार मत देताना गोंधळले, चर्चा सुरू झाली आणि वातावरण अस्वस्थ झाल्याचे समोर आले.

उमेदवार ॲड. शेखर वाकोडे यांनी तातडीने निवडणूक प्रशासन, प्रक्रिया अधिकारी आणि बूथ अधिकाऱ्यांचे लक्ष या गंभीर त्रुटीकडे वेधले. मात्र सकाळी सुरू झालेल्या पाठपुराव्यानंतरही कोणतीही दुरुस्ती किंवा स्पष्ट भूमिका दिसून आलेली नाही. उमेदवारांनी हा प्रकार लोकशाही प्रक्रियेस बाधक असल्याचे स्पष्ट केले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते महेश तपासे यांनीही या घटनांवर आक्षेप घेतला, तसेच सांगितले की निवडणूक आयोगाने उमेदवाराचे नाव चुकीने दाखवले असून हा अन्याय असून मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करतो. तपासे यांनी म्हटले की शेखर वाकोडे या प्रकरणी न्यायालयात जाऊन निवडणूक रद्द करण्याची मागणी करणार आहेत.

## भिवंडीत महापालिकेसाठी मतदान पूर्ण
### मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १५, भिवंडी :**

भिवंडी शहर महानगरपालिकेच्या २३ प्रभागांतील ९० जागांसाठी महापालिका निवडणूक विविध ठिकाणी तणावपूर्ण तर काही प्रभागात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सांयकाळी साडेपाच वाजेपर्यंत अंदाजे ५८% मतदान झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. दिवसभरात शहरातील विविध भागात किरकोळ हाणामारी, शिवीगाळ, तसेच काही उमेदवारांकडून पैसे वाटप झाले असल्याचे आरोप समोर आले. पोलिसांनी गंभीर नोंद घेतली आणि आवश्यक गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली. अनेक ठिकाणी मतदान केंद्रांवर हाणामारी व गोंधळामुळे पोलिसांना जमाव शांत करताना दमछाक झाली, तर काही ठिकाणी गर्दी पांगवण्यासाठी पोलिसांची धावपळ झाली.

या दरम्यान, महिला, पुरुष आणि युवा मतदारांची मोठी उपस्थिती पाहायला मिळाली. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, २३ प्रभागांतील ९० जागांसाठी ४३८ उमेदवार निवडणूक लढवले होते आणि ७५० मतदान केंद्र शहरभर उभे केले गेले होते.

भाजप, काँग्रेस, समाजवादी पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस (श), मनसे, शिवसेना (उबाठा), कोणार्क विकास आघाडी, राष्ट्रवादी काँग्रेस (अ), भिवंडी विकास आघाडी आणि इतर राजकीय पक्ष तसेच अपक्ष उमेदवारांनी विविध प्रभागांमध्ये मोठी चुरस निर्माण केली. महापौर माजी प्रतिभा पाटील, कोणार्क विकास आघाडीचे प्रमुख व माजी महापौर विलास आर. पाटील, माजी महापौर जावेद दळवी, माजी उपमहापौर मनोज काटेकर, नारायण चौधरी, निलेश चौधरी, प्रशांत लाड यासह सर्व ४३८ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले.

उद्या, शुक्रवारी 16 जानेवारी, सकाळी १० वा. कोंबडपाडा गाजेंगी हॉल, कामतघर वऱ्हाळा माता सभागृह, भादवड संपदा हॉल, मिंलत नगर फरहान हॉल अशा विविध निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात मतमोजणी होणार असून. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मतमोजणीसाठी सुरक्षितता आणि तयारी पूर्ण केली आहे. पोलिसांनीही मतमोजणी केंद्रांबाहेर कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे.

शिवसेना, भाजप, काँग्रेस, समाजवादी पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, कोणार्क विकास आघाडी आणि अपक्ष उमेदवारांमध्ये निकालाबाबत प्रचंड उत्सुकता लागलेली आहे. शहरभर मतदानासाठी विशेष सुट्टी जाहीर केली गेली होती. त्यामुळे शहरातील अनेक कामगार व कुटुंबे मतदानासाठी रस्त्यावर उतरण्याची नोंद झाली, आणि बहुसंख्य कापड कारखान्याचा खडखडाट थांबला होता. मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मतदान यंत्रे सुरक्षित स्थळी नेण्यात आली आहेत तसेच उद्याच्या मतमोजणीसाठी संपूर्ण तयारी पूर्ण झाली आहे.





# डोंबिवलीत पॅनेल पद्धतीचा मतदान प्रयोग फसला

## मतदारांना अपेक्षित अनुभव मिळालाच नाही

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली, ता. १५ :** कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीत प्रथमच पॅनेल पद्धतीने मतदान प्रक्रिया राबविण्यात आली. काही पॅनेलमध्ये इतर उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने केवळ एकच उमेदवार निवडणूक रिंगणात होता. त्यामुळे प्रत्यक्षात डोंबिवलीतील काही मोजक्या मतदान केंद्रांवर मतदारांना या पद्धतीचा अपेक्षित अनुभव घेता आला नाही, अशी नाराजी व्यक्त होत आहे.

कल्याण-डोंबिवलीमध्ये महायुतीचे २० उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. यातील १९ उमेदवार डोंबिवली भागातील आहेत. यातही डोंबिवली पश्चिमेतील एक पूर्ण पॅनेल बिनविरोध निवडून आले असून, तीन पॅनेलमधील एकच उमेदवार तर काही ठिकाणी दोन उमेदवार निवडणूक रिंगणात उरले होते. त्यांच्यासाठी मतदान प्रक्रिया पार पडली. पॅनेल पद्धतीनुसार मतदारांना एका उमेदवाराऐवजी चार उमेदवारांना मतदान करणे अपेक्षित होते. मात्र डोंबिवलीतील दोन ते तीन पॅनेलमध्ये केवळ एकच उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होता. उर्वरित तीन उमेदवार बिनविरोध निवडून आल्यामुळे पॅनेलमधील प्रत्यक्ष लढत केवळ एका उमेदवारापुरती मर्यादित राहिली. या परिस्थितीमुळे संबंधित मतदान केंद्रांवर फक्त एकच मतदान यंत्र ठेवण्यात आले होते. परिणामी, मतदारांना चार उमेदवारांना मतदान करण्याची प्रक्रिया अनुभवता आली नाही. त्यामुळे पॅनेल पद्धतीचा मूळ उद्देशच काही अंशी अपूर्ण राहिल्याची भावना मतदारांमध्ये दिसून आली.

# मतदानाच्या अवघ्या एक तासांत पुसली गेली बोटावरची शाई

## सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास घाणेकर यांच्या सोबत घडला प्रकार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीसाठी मतदानाला सुरवात झाली असून मतदानाच्या अवघ्या एक तासांत बोटावरची शाई पुसली गेल्याचा प्रकार कल्याण मधील सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास घाणेकर यांच्यासोबत घडला आहे. निवडणूक आयोगाचा भोंगळ कारभार असल्याची टीका घाणेकर यांनी केली आहे.

तर श्रीनिवास घाणेकर आणि त्यांची पत्नी ज्योती घाणेकर यांचे मतदान पॅनल क्रमांक सात येथे येणे आवश्यक असताना त्यांच्या जुन्या पत्त्यावर पॅनल नंबर आठ नॅशनल उर्दू हायस्कूल मध्ये दाखवले होते. रूम क्रमांक सात मध्ये त्यांचे नाव आढळले नाही, रूम क्रमांक आठ मध्ये सुद्धा नाव आढळले नाही. बाहेर बीएलओकडे नाव आढळते, आतल्या याद्या मात्र वेगळ्या आहेत. शेवटी खोली क्रमांक सहा मध्ये दोघांचा अनुक्रमांक मिळाला. त्यामुळे मतदार याद्यांमध्ये व मतदार केंद्रामध्ये गोंधळ असल्याचा आरोप श्रीनिवास घाणेकर यांनी केला आहे. हा गोंधळ एवढ्यावरच न थांबता घाणेकर यांनी मतदान केल्यानंतर अवघ्या एक तासांत साबणाने हात धुतल्याने बोटावरची शाई गायब झाली असून यामुळे दुबार मतदान होण्याची शक्यता घाणेकर यांनी वर्तवली आहे.

तर अशाच प्रकारच्या शाई पुसण्याच्या घटना कल्याण डोंबिवली शहरात अनेक ठिकाणी घडल्याने निवडणूक यंत्रणेच्या कामकाजावर सर्वसामान्य नागरिकांनी सवाल उपस्थित केला आहे.

# आमदार ॲड. निरंजन डावखरे यांनी पत्नीसमवेत बजावला मतदानाचे कर्तव्य

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**ठाणे :** ठाणे शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार व ठाणे महानगरपालिका निवडणूक प्रभारी ॲड. निरंजन डावखरे यांनी आज ठाणे शहरातील भगवती विद्यालयातील मतदान केंद्रावर पत्नी सौ. नीलिमा डावखरे यांच्यासमवेत आपले मतदानाचे कर्तव्य बजावले.

लोकशाहीच्या या महत्त्वपूर्ण प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवत आमदार डावखरे यांनी नागरिकांसमोर मतदानाचे महत्त्व अधोरेखित केले. या वेळी वृत्तमाध्यमांशी संवाद साधताना ॲड. निरंजन डावखरे म्हणाले की, "मतदानाचा हक्क हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येकाने मोठ्या संख्येने मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे." आपल्या प्रभागाच्या विकासासाठी, ठाणे शहराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि उज्वल भविष्यासाठी नागरिकांनी मतदान केंद्रावर जाऊन मोठ्या संख्येने मतदान करावे, असे आवाहन त्यांनी केले. लोकशाहीच्या या उत्सवात सहभागी होऊन आपला मतदानाचा हक्क बजावण्याची हीच खरी लोकशाही सेवा असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

# आमदार विश्वनाथ भोईर यांनी बजावला मतदानाचा हक्क



## कल्याणमध्ये वाहणार महायुतीचे वारे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पश्चिम शिवसेनेचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी मतदानाचा हक्क बजावला. उंबर्डे येथील मतदान केंद्रावर जाऊन भोईर यांनी मतदान केले. मतदान हा लोकशाहीमध्ये सामान्य माणसाला मिळालेला अधिकार आहे. बाळासाहेब ठाकरे यांनी सांगितलं आहे, एक मत द्या आणि इतिहास घडवा. त्यामुळे प्रकृती ठीक नसतांना देखील मतदान केले असून नाही तर बाळासाहेबांचा शिवसैनिक कसला असे आमदार विश्वनाथ भोईर यांनी सांगतीले. तर कल्याणमध्ये महायुतीचेच वारे वाहणार असून इतर कोणत्याही आघाडीचा परिणाम महायुतीवर होणार नाही. महायुतीच्या कार्यकर्त्यांनी नागरिकांची कामे केली असल्याने जनता महायुतीच्या पाठीशी असल्याचे भोईर यांनी सांगितले.

# मुरबाड मधील 23 जिल्हा परिषद शाळा होणार डिजिटल



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा हळूहळू कात टाकत असून काळाची पावले ओळखून विद्यार्थी हा केंद्र बिंदू ठेवून जिल्हा परिषदे मार्फत अनेक चांगले निर्णय घेतले जात आहेत.शाळा डिजिटल करण्यासाठी तत्कालीन पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या विकास निधीतून नाविण्यपुर्ण योजनेअंतर्गत रिअल इंटरप्राइजेस तसेच होम रिवाईज मार्फत नुकतेच " ऑल इन वन" प्रोजेक्टरचे वाटप करण्यात आले आहे. तालुक्यातील 23 शाळांना या प्रोजेक्टरचा लाभ मिळणार आहे. यामध्ये तालुक्यातील भुवन, जांभुर्डे, कोरावळे, म्हसा, देवगाव, टाकीची वाडी, शास्त्रीनगर, मुरबाड 2, माळीपाडा, शिरगांव, कुडवली, कोळठण, मानिवली गो. शिरवली, खेवारे महाज, खोपिवली, वैशाखरे, डोंगरन्हावे, पाटगाव, सोनावळे, खापरी आदी शाळांचा समावेश आहे.

ही मदत मिळवून देण्यासाठी ज्ञानेश्वर ठाकरे (भुवन)भालचंद्र ठाकरे, तुषार तुंगार यांचे मोलाचे योगदान मिळाले आहे.

# निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** जिल्हा परिषद व पंचायत समिती, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणूक 2026 जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूकिची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत संपूर्ण रायगड जिल्ह्यात सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय,संस्था, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्याच्या ठिकाणी धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध घालण्यात आले असल्याचे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आज जारी केले आहेत.

मा.भारत निवडणूक आयोगाने दि.13 जानेवारी 2026 रोजीच्या प्रसिध्दी पत्रकान्वये जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-2026 चा कार्यक्रम जाहीर केला आहे. निवडणूक कार्यक्रम घोषीत केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे. रायगड जिल्ह्यात गुरुवार, दि.5 फेब्रुवारीला मतदान तर शनिवार, दि.7 फेब्रुवारी 2026 रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हादंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी, तालुका दंडाधिकारी कार्यालय तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्यावर कोणत्याही राजकीय पक्षाने, व्यक्तीने, संघटनेने, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा त्याच्या हितचिंतकाने धरणे, आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर (आचारसंहितेच्या कालावधीमध्ये) निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात येत आहेत. तसेच सर्व संबंधितांना नोटीस देऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेणे सद्यःस्थितीत शक्य नसल्याने जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी एकतर्फी आदेश काढणे आवश्यक असल्याची खात्री करून घेतली आहे.

जिल्हादंडाधिकारी रायगड यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, 2023 चे कलम 163 अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन निर्बंध आदेश जारी केले आहेत.

# मुरबाडमध्ये उलगडले कंदमुळांचे अनोखे विश्व

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** आळू, दावा कासार आळू, खुरपिना आळू, चिडवा आळू, राज आळू, काटेकणंग, झाड आळू, आरारूट, कोणी, करांदे, रताळे, सुरण साबू कंद, माईन मुळा, शतावरी, सफेद व काळी मुसळी, चायनीज व एरियल बटाटा अशी तब्बल ६० प्रकारची कंदमुळे पाहण्याची, तसेच विविध कंदमुळांपासून बनविलेल्या पदार्थांचा आस्वाद घेण्याची संधी खवय्यांना मिळाली. निमित्त होतं ते अश्वमेध प्रतिष्ठान, श्रमिक मुक्ती संघटना, वननिकेतन, सुखी भूमी, कॅम्पर शेफ, अरण्य, सेव्ह बॉम्बे कमिटी, रोटरी क्लब ऑफ कल्याण आणि इनटेंच ठाणे विभागाने मुरबाड तालुक्यातील मासले बेलपाडा येथे नुकत्याच भरविलेल्या कंदमूळ महोत्सवाचे!

ग्रामीण भागातील विशेषतः आदिवासींच्या आहारात आजही कंदमुळे व त्यापासून बनविलेल्या विविध पदार्थांचा समावेश असतो. कंदमुळांचे आरोग्यदायी फायदे समजावेत, तर दुसरीकडे कंदमुळांचे बाजारमूल्य ओळखून त्याच्या लागवडीकडे शेतकरी आदिवासींनी वळावे, या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन केले होते.तापमान वाढीचा पिकांच्या उत्पादनावरही परिणाम होत आहे. मात्र, वाढते तापमान कंदमुळांच्या लागवडीसाठी पोषक आहे, त्याबरोबर जमिनींचा पोत विचारात घेता, तसेच इतर पिकांच्या तुलनेत कोणत्याही भागांत कंदमुळांची कमी खर्चात मोठ्या प्रमाणावर लागवड करणे शक्य आहे, याकडे दापोली कृषी विद्यापीठाचे प्रा. नामदेव म्हसकर यांनी लक्ष वेधले.

### आदिवासी महिलांना दिली बक्षिसे

आदिवासींकरिता अधिकाधिक कंदमुळे आणणे आणि पाककृती स्पर्धा झाली. त्यात विजेत्या ठरलेल्या मुरबाड आणि शहापूर तालुक्यातील महिलांना रोख रक्कम आणि वस्तूंस्वरुपात बक्षिसे देण्यात आली.

# पेण नगरपालिका मैदानावर क्रिकेट प्रेमींसाठी डिके चषकाचे आयोजन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** पेण येथील समाजसेवक दत्ता कांबळे उर्फ डिके आयोजित भव्यदिव्य टेनिस क्रिकेट सामने पेण नगरपालिका मैदानावर क्रिकेट प्रेमींसाठी ग्रामीण व शहरी खेळाडूंसाठी सुरू असून या क्रिकेट सामन्यांचे उद्घाटन उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल, वक्रतुंड मित्र मंडळाचे संस्थापक दत्ता कांबळे, श्रीमती साधना कांबळे, पेण प्रेस क्लब अध्यक्ष देवा पेरवी, राजेश्री कांबळे, माजी सरपंच मंगेश पाटील, प्रवीण पाटील, विनायक पाटील, राजू कांबळे, राज कडू, स्वप्नील पाटील, गजानन पाटील, ओमकार डाकी, सचिन पाटील

## ग्रामीण व शहरी खेळाडूंसाठी पर्वणी

आदी मान्यवर उपस्थित होते.

डिके चषक 2026 च्या उद्घाटन प्रसंगी नेहमीच जनतेच्या संरक्षणासाठी तत्पर असलेले पेण पोलीस आणि महसूल विभागात नागरिकांच्या प्रश्नांना न्याय देणारे तहसील कर्मचारी यांच्यामध्ये मैत्रीपूर्ण लढत झाली. या लढतीत तहसील कर्मचारी यांनी नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी केली. पेण पोलिसांनी संयमी खेळ करीत पाच षटकात 48 धावांचे आव्हान तहसील समोर ठेवले. यावेळी पेण तहसील कर्मचारी यांनी उत्कृष्ठ व संयमी खेळ करीत शेवटच्या चेंडूत जोरदार चौकार लागावत 50 धावा करत दणदणीत विजय मिळवला. सदर प्रेक्षणीय सामन्यात विजेता ठरलेल्या पेण तहसील कर्मचारी संघाला आयोजक दत्ता कांबळे यांच्या हस्ते भव्यदिव्य ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. सदर सामन्यांचे नियोजन वक्रतुंड मित्र मंडळ पेण यांनी केले आहे.

# जिल्हा रुग्णालयात 'रजोनिवृत्ती क्लिनिक'चा शुभारंभ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड :** वयाची चाळीशी ओलांडल्यानंतर महिलांच्या शरीरात होणारे हार्मोनल बदल आणि रजोनिवृत्तीच्या (Menopause) काळात उद्भवणाऱ्या विविध शारीरिक व मानसिक समस्यांवर योग्य मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने जिल्हा रुग्णालयात 'रजोनिवृत्ती क्लिनिक'चा शुभारंभ करण्यात आला. शासनाच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेले हे क्लिनिक जिल्ह्यातील ४० ते ५५ वयोगटातील महिलांसाठी मकर संक्रांतीचे एक अनोखे आरोग्यदायी वाण ठरले आहे.या विशेष उपक्रमाचे आयोजन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी यांच्या उपस्थितीत करण्यात आले.रजोनिवृत्ती हा महिलांच्या आयुष्यातील एक अत्यंत संवेदनशील टप्पा असून या काळात अनेक स्त्रिया अनेक समस्यांशी लढा देत असतात. हे लक्षात घेऊन या क्लिनिकच्या माध्यमातून महिलांना सर्वसमावेशक आरोग्य सेवा पुरवली जाणार आहे.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. भोपाळे यांनी रजोनिवृत्ती दरम्यान शरीरात होणाऱ्या बदलांची सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, पाळी थांबण्याच्या प्रक्रियेत शरीरातील हार्मोन्सची पातळी कमी-जास्त होते, ज्यामुळे हाडांचा ठिसूळपणा वाढतो व थोडीशी पडझड झाल्यास देखील हाड मोडू शकते. तसेच उष्णता जाणवते (Hot Flashes) आणि थकवा यांसारखे त्रास उद्भवतात. योग्य वैद्यकीय सल्ला आणि जीवनशैलीत बदल केल्यास हे त्रास सहज दूर होऊ शकतात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. रजोनिवृत्तीचा परिणाम केवळ शारीरिक स्वास्थ्यावरच नाही, तर मानसिक आरोग्यावरही होतो. याबाबत अधिक माहिती देताना मानसोपचार तज्ज्ञ डॉ. अर्चना सिंग म्हणाल्या की, हार्मोनल बदलांमुळे या वयोगटातील महिलांमध्ये चिडचिड होणे, अचानक नैराश्य येणे किंवा झोप न लागणे अशा समस्या दिसून येतात. अशा वेळी कुटुंबाचा आधार आणि तज्ज्ञांचे समुपदेशन महिलांना या स्थितीतून बाहेर पडण्यास मदत करते.

अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शितल जोशी यांनी या नवीन सुविधेबाबत अधिक माहिती दिली. "जिल्हा रुग्णालयातील हे रजोनिवृत्ती क्लिनिक दर बुधवारी महिलांच्या सेवेसाठी उपलब्ध असेल. या वयोगटातील महिलांची मोफत तपासणी, औषधोपचार आणि समुपदेशन या दिवशी केले जाईल," असे त्यांनी जाहीर केले. जास्तीत जास्त महिलांनी या मोफत सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.या उद्घाटन कार्यक्रमाला मेट्रन गायत्री म्हात्रे, असिस्टंट मेट्रन अनिता भोपी, विविध विभागांच्या परिसेविका, रुग्णालयातील कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिम सुतार यांनी केले. जिल्हा रुग्णालयाच्या या स्तुत्य उपक्रमामुळे महिला वर्गातून समाधान व्यक्त होत असून, स्त्रियांच्या आरोग्याकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन या निमित्ताने समोर आला आहे.

# जीवनदीप महाविद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस अभिवादन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली :** हिंदवी स्वराज्य स्थापन करणारे छत्रपती शिवाजी महाराज; यांच्या आई राजमाता जिजाबाई तसेच शिकागोच्या धर्म परिषदेमध्ये आपल्या भाषणाने लाखो लोकांच्या मनात आदराचे स्थान मिळवणारे स्वामी विवेकानंद. यांची जयंती जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे इतिहास विभागाच्या अंतर्गत साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. अशोक वाघ, ग्रंथपाल. प्रा. राजाराम कापडी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व पुष्पहार अर्पण करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी या महान विभूतींच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. प्रा. धनश्री नाईक यांनी अमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा सर्व विद्यार्थ्यांकडून सामूहिकरीत्या बोलून घेतली. जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे,संचालक. प्रशांत घोडविंदे प्राचार्य. डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे, इतिहास विभाग प्रमुख. प्रा. कविता काटकर इतर प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी , विद्यार्थी यांच्या एकत्रित सहभागाने हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

# भविष्यवेध



शुक्रवार
१६ जानेवारी २०२६

**मेष**
वैवाहिक जीवन सुसंवादी राहील. महिला ऑनलाइन नवीन पदार्थ शिकण्याचा प्रयत्न करतील. तुमचे वडील तुम्हाला महत्वाच्या निर्णयात पाठिंबा देतील. काम पूर्ण करण्यात यशस्वी व्हाल.

**वृषभ**
तुम्हाला प्रत्येक बाबतीत सकारात्मक राहावे लागेल. मित्रांसोबत जुन्या समस्यांवर चर्चा केल्याने चांगले उपाय मिळतील.

**मिथुन**
तुम्ही एक सखोल योजना बनवाल आणि तुमच्या पालकांचा सल्ला घ्याल. सरकारी धोरणे आणि नियमांकडे बारकाईने लक्ष दिल्यास तुमचे काम सोपे होईल.

**कर्क**
तुमच्या जोडीदाराच्या भावना समजून घेण्यात तुम्ही यशस्वी व्हाल. आज तुम्हाला कौटुंबिक कामासाठी बरेच पैसे खर्च करावे लागतील.

**सिंह**
तुम्हाला मित्राकडून पाठिंबा मिळेल. कुटुंबातील सदस्यांच्या विनोदी वागण्यामुळे घरातील वातावरण अधिक आल्हाददायक होईल.

**कन्या**
तुम्ही एखाद्या मोठ्या प्रकल्पात पैसे गुंतवण्याचा विचार करत असाल तर प्रथम अनुभवी व्यक्तीचा सल्ला घ्या. आर्थिक स्थिती सुधारेल.

**तुळ**
एखाद्या विषयावर इतरांशी बोलणे किंवा सल्लामसलत करणे फायदेशीर ठरेल. तुम्ही महत्त्वाच्या बाबी आणि नातेसंबंधांचा विचार कराल.

**वृश्चिक**
व्यवसायात पैसे गुंतवण्यापूर्वी तुमच्या वडिलांचा सल्ला घेणे शहाणपणाचे ठरेल. तुमचे वडील त्यांच्या मुलांच्या इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न करतील.

**धनु**
तुम्हाला करिअरच्या नवीन संधी मिळतील. नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी तुमच्या मोठ्या भावाकडून तुम्हाला मदत मिळेल.

**मकर**
तुम्हाला एखाद्या नातेवाईकाकडून चांगली बातमी मिळेल. तुमचा जोडीदार तुम्ही जे काही बोलता ते समजून घेण्याचा प्रयत्न करेल. नात्यात ताजेपणा येईल.

**कुंभ**
एखाद्या खास व्यक्तीशी बोलू शकता. तुम्हाला आर्थिक फायदा होईल आणि उत्पन्नाचे नवीन स्रोत सापडतील. लहान मुले आज खूप आनंदी असतील. तुमच्या योजना इतरांना खूप प्रभावित करतील.

**मीन**
तुमची आर्थिक परिस्थिती मजबूत राहील. आज बोलण्यात संयम राखा, नाहीतर बिझनेसमध्ये महत्वाची डील गमवाल.

दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता

| | |
|---|---|
| Facebook | https://www.facebook.com/jeevandeepnews/ |
| Instagram | https://www.instagram.com/thane_jeevandeep/ |
| X | https://x.com/Jeevandeepvarta |
| www | https://jeevandeepvarta.com/ |




# कल्याण–डोंबिवलीत उत्स्फूर्त मतदान

## सकाळपासूनच मतदारांच्या रांगा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १५**

**कल्याण : कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीसाठी गुरुवारी सकाळी साडे सात वाजल्यापासून मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली. शहराच्या विविध भागांतील पालिका कार्यालये, मतदारांच्या घरांच्या परिसरात तसेच खासगी गृहनिर्माण संकुलांच्या आवारात उभारण्यात आलेल्या मांडवांमध्ये मतदान केंद्रे सुरू करण्यात आली होती.**

दुपारच्या वेळेत मतदान केंद्रांबाहेर मोठ्या रांगा लागण्याची शक्यता वर्तवली जात असून, काही उत्साही उमेदवारांनी सकाळपासूनच आपल्या मतदारांना मतदानासाठी केंद्रांपर्यंत आणण्यासाठी पुढाकार घेतला आहे. यामुळे सकाळपासूनच डोंबिवली आणि कल्याण शहरातील विविध मतदान केंद्रांवर मतदारांच्या रांगा पाहायला मिळत आहेत.

मतदानासाठी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली असली, तरी अनेक कष्टकरी, मजूरवर्गातील मतदार पाठीला पिशव्या लावून मतदान करून थेट कामावर जाण्यासाठी सज्ज झाल्याचे चित्र दिसत होते. “आम्ही मतदान करतोय,” याचा वेगळाच आनंद प्रथमच मतदान करणाऱ्या युवा मतदारांच्या चेहऱ्यावर दिसून आला. हा युवा मतदार वर्ग आपल्या कुटुंबीयांसह मतदानासाठी बाहेर पडला होता.

सकाळच्या वेळेत मतदानासाठी बाहेर पडलेल्या मतदारांमध्ये ज्येष्ठ नागरिकांचा सर्वाधिक भरणा दिसून आला. अनेक उमेदवारांनी आपल्या प्रभागात ज्येष्ठ नागरिक, वृद्ध तसेच सामान्य मतदारांना मतदान केंद्रापर्यंत पोहोचवण्यासाठी रिक्षांची विशेष व्यवस्था केली आहे. एका उमेदवाराने दिवसभरासाठी एक रिक्षा 2500 रुपये भाड्याने घेतल्याची माहिती मिळाली. अशा प्रकारे दहा ते पंधरा रिक्षांचा ताफा प्रत्येक उमेदवाराने आपल्या प्रभागात मतदारांना मतदान केंद्रापर्यंत ने-आण करण्यासाठी तैनात केला आहे.

# “चालता-चालता मतदान”

## ठाणेकरांचा लोकशाहीचा आगळा उत्सव ■ मॉर्निंग वॉकसोबत मतदान

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १५**

**ठाणे :** ठाणे, घोडबंदर, कळवा आणि मुंब्रा परिसरातील नागरिकांनी गुरुवारी मतदानाचा दिवस एका वेगळ्याच पद्धतीने साजरा केला. दररोजप्रमाणे सकाळी मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडलेले अनेक नागरिक चालता-चालता थेट मतदान केंद्राकडे वळले आणि आपला मतदानाचा हक्क बजावला. यामुळे सकाळच्या पहिल्याच सत्रात मतदान केंद्रांवर मतदारांची लक्षणीय गर्दी पाहायला मिळाली.

सकाळी लवकर उठून व्यायाम, चालणे किंवा धावणे करणाऱ्या नागरिकांनी “आधी मतदान, मग दिनक्रम” असा निर्धार केल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसून आले. काही ठिकाणी नागरिकांनी मॉर्निंग वॉकदरम्यानच मतदान केंद्रासमोर रांगा लावल्या, तर काहींनी व्यायाम पूर्ण केल्यानंतर थेट मतदानासाठी हजेरी लावली.

विशेष म्हणजे, या मॉर्निंग वॉक करणाऱ्या मतदारांमध्ये ज्येष्ठ नागरिक, मध्यमवयीन नोकरदार वर्ग तसेच आरोग्याबाबत जागरूक असलेले तरुण मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. “आरोग्य आणि लोकशाही दोन्ही महत्त्वाची,” अशी भावना अनेक मतदारांनी व्यक्त केली. काही नागरिकांनी आपल्या कुटुंबीयांनाही सकाळीच मतदानासाठी सोबत आणले होते.

**सकाळी मतदान झाल्यामुळे दिवसभरातील गर्दी टाळता आल्याची प्रतिक्रिया अनेक मतदारांनी दिली. त्यामुळे प्रशासनालाही सुरुवातीच्या टप्प्यात मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडणे सोपे गेले. अनेक मतदान केंद्रांवर सकाळच्या वेळेतच समाधानकारक मतदान झाल्याचे चित्र दिसून आले लोकशाहीचा हा उत्सव साजरा करताना नागरिकांनी दाखवलेली ही जागरूकता ठाणे, घोडबंदर, कळवा आणि मुंब्रा परिसरातील मतदारांची लोकशाहीप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित करणारी ठरली.**

# सामनातून मतदारांना भावनिक आवाहन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १५**

**ठाणे :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीदरम्यान ठाकरे बंधूंनी प्रचारसभांमधील भाषणांतून मराठी माणसाला आणि मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे करण्याचा डाव रचला जात असल्याचा दावा केला होता. यावेळी त्यांनी भाजप आणि शिंदे गटावर विविध आरोप केले होते. त्यानंतर आता ‘सामना’ या ठाकरे सेनेच्या मुखपत्रातूनही मतदारांना भावनिक साद घालण्यात आली होती.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी मराठी भाषेचा मुद्दा उपस्थित करत मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचे षड्यंत्र रचले जात असल्याचा आरोप भाजप आणि शिंदे गटावर केला होता. ठाकरे बंधूंच्या या भाषणांवर समाजमाध्यमांवर विविध प्रतिक्रिया उमटल्या होत्या. त्याच पार्श्वभूमीवर सामना मधूनही या मुद्द्याला पुढे नेण्यात आले होते.

शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांनी सुरू केलेले ‘सामना’ हे शिवसेनेचे मुखपत्र होते. या वृत्तपत्राच्या माध्यमातून पक्षाची भूमिका आणि दिशा मांडली जात होती. सध्या या वृत्तपत्राचे संपादक म्हणून उद्धव ठाकरे कार्यरत होते, तर संजय राऊत हे कार्यकारी संपादक होते. संपादकीय लेखातून भाजप आणि शिंदे गटावर जोरदार टीका करण्यात आली होती.

**■ मराठी अस्मितेचा मुद्दा केंद्रस्थानी**

या निवडणुकीत मराठी भाषेचा आणि मराठी अस्मितेचा मुद्दा केंद्रस्थानी राहिला होता. प्रचारादरम्यान मराठी माणसाच्या हक्कांवर, मुंबईच्या अस्मितेवर आणि महाराष्ट्राच्या एकात्मतेवर चर्चा रंगली होती. याच पार्श्वभूमीवर अनेक मतदारांनी मराठीच्या मुद्द्यावरून मतदान केल्याची भावना व्यक्त केली होती. विशेषतः मराठी भाषिक मतदारांमध्ये या मुद्द्याबाबत जागरूकता दिसून आली होती. “मराठी माणसाचा आवाज ऐकला गेला पाहिजे,” या भूमिकेतून मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावल्याचे चित्र अनेक मतदान केंद्रांवर पाहायला मिळाले होते.

# महारेरामधील तक्रार निवारणाला गती

## वर्षभरात 6,945 प्रकरणांचा निपटारा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** महारेराकडे नोंदवण्यात येणाऱ्या तक्रारींवर वेळेत कारवाई होत नसल्याचे चित्र काही काळ सातत्याने दिसून येत होते. तक्रार निवारण करणाऱ्या समितीमध्ये सदस्यांची संख्या कमी असल्याने अनेक प्रकरणे महिने-महिने, तर काही वर्षानुवर्षे प्रलंबित राहिली होती. यामुळे घरखरेदीदारांना मोठ्या मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत होते. या पार्श्वभूमीवर गेल्या वर्षी महारेरामध्ये त्रिसदस्य समितीतील उर्वरित मुख्य सदस्यांची नेमणूक करण्यात आली. त्यानंतर तक्रार निवारण प्रक्रियेला लक्षणीय गती मिळाली आहे. महारेरा प्राधिकरणाच्या माहितीनुसार, गेल्या एका वर्षाच्या कालावधीत तब्बल ६ हजार ९४५ तक्रारींचा निपटारा करण्यात आला असून, यामुळे हजारो गृहखरेदीदारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

घरखरेदीदारांना आपली तक्रार महारेराकडे ऑनलाइन पद्धतीने नोंदवता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित विकासकाला नोटीस पाठवली जाते आणि दोन्ही पक्षांना आपली बाजू मांडण्याची संधी दिली जाते. नियोजित सुनावण्या, कागदपत्रांची तपासणी, करारातील अटी, प्रकल्पाची प्रगती आणि कायदेशीर तरतुदींच्या आधारे प्राधिकरण निर्णय देते. प्रकरणानुसार व्याजासह रक्कम परत करण्याचे आदेश, ठराविक कालावधीत ताबा देण्याचे निर्देश किंवा नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले जातात.

महारेराचे आदेश बंधनकारक असून त्यांचे उल्लंघन झाल्यास दंडात्मक कारवाई, अतिरिक्त व्याज किंवा प्रकल्प नोंदणी रद्द करण्यासारखी कठोर पावले उचलण्याचे अधिकार प्राधिकरणाकडे आहेत. त्यामुळे विकासकांवर कायद्याची वचक राहते. सदस्यसंख्या पूर्ण झाल्यामुळे आता तक्रारी मार्गी लागण्याचा वेग वाढला असून, भविष्यात प्रलंबित प्रकरणांचा डोंगर कमी होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# भाजप आणि आघाडीच्या कार्यकर्त्यांत शाब्दिक चकमक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**प्रतिनिधी / दि. १५ पनवेल : नवी मुंबई, ता. १५ – पनवेल महापालिकेच्या निवडणुकीसाठी आज ६५६ मतदान केंद्रांवर नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दाखवला. दुपारी ३.३० वाजेपर्यंत ४४ टक्के मतदानाची नोंद झाली होती. काही ठिकाणी ईव्हीएम बंद पडल्यामुळे सुरुवातीला उशिरा मतदान सुरू झाले, परंतु प्रशासनाच्या वेळीच हस्तक्षेपामुळे मतदान सुरळीत पार पडले.**




- **दुपारी ३.३० वाजेपर्यंत ४४% मतदान नोंद**
- **खारघर, कामोठे, तळोजा, खुटारी येथे मशीन बिघाड**
- **पोलिसांनी तणाव टाळण्यासाठी तत्काळ हस्तक्षेप**
- **कळंबोली, नवीन पनवेल, खारघर येथे रंगीत थीमसह मतदान केंद्र**
- **कामोठे येथील सुषमा पाटील विद्यालयात लांबच लांब रांगा**

सकाळी साडेसात वाजल्यापासून सर्व मतदान केंद्रांवर मतदान वेळेत सुरू झाले. खारघर, कामोठे, तळोजा आणि खुटारी या भागात ईव्हीएम बंद पडल्याच्या तक्रारी समोर आल्या. प्रशासनाने पर्यायी मशीन पाठवून मतदान सुरळीत सुरू केले. खारघर येथील विबग्योर शाळा आणि खुटारी गावातील मशीन बिघाड दूर केल्यावर मतदान सुरू झाले. महापालिकेच्या कळंबोली, नवीन पनवेल आणि खारघर येथील मतदान केंद्रांवर विविध रंगाची थीम लावण्यात आली होती, ज्यामुळे मतदार भारावून गेले. कामोठे येथील सुषमा पाटील विद्यालय येथे मतदारांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळाल्या.वेलमधील प्रभाग क्रमांक १९ मध्ये मतदारावर दबाव टाकण्याच्या घटनेमुळे भाजप आणि महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक चकमक झाली; पोलिसांनी वेळीच मध्यस्थी करून समस्या टाळली.

# ठाण्यात 643 उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात कैद

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १५ :**

**ठाणे :** ठाणे महापालिका निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या ६४३ उमेदवारांचे भवितव्य गुरुवारी मतदान यंत्रात बंद झाले. या निवडणुकीत दुपारी साडेतीन वाजेपर्यंत ४३ टक्के मतदान झाले होते, तर सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदान केंद्रावर आलेल्या मतदारांना टोकन देण्यात आले होते. मतदान उशिरापर्यंत सुरू असल्याने अंतिम मतदान टक्केवारी अद्याप निश्चित करता आली नाही. गेल्या निवडणुकीत महापालिकेत ५९ टक्के मतदान झाले होते. दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मतदार संघातील काही उमेदवार बिनविरोध निवडून आल्यामुळे चर्चेत राहिलेल्या या निवडणुकीच्या दिवशी, मतदान यंत्रातील बिघाड आणि इतर तांत्रिक कारणांमुळे काही ठिकाणी गोंधळ उडाल्याचे चित्र दिसून आले. महापालिका क्षेत्रात १६,४९,८६९ मतदार आहेत, ज्यामध्ये ८,६३,८७८ पुरुष, ७,८५,८३० महिला आणि १५९ इतर मतदार आहेत. या निवडणुकीसाठी ९ प्रभागांमध्ये ११ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची कार्यालये कार्यरत होती. या निवडणुकीसाठी एकूण १,१०७ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले, त्यापैकी ९९ उमेदवारांचे अर्ज छाननीदरम्यान बाद झाले. तर १ आणि २ जानेवारीला उमेदवारी मागे घेण्याच्या दिवशी २६९ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. परिणामी, एकूण ६४९ उमेदवार निवडणूक लढवत होते, त्यापैकी शिवसेना (शिंदे गट) पक्षाचे ६ उमेदवार बिनविरोध निवडून आले. त्यामुळे ६४३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहिले आणि त्यांचे भवितव्य गुरुवारी मतदान यंत्रात बंद झाले.

# कल्याण डोंबिवलीत मतदानाचा टक्का घसरला

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**प्रतिनिधी / दि. १५ :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी गुरुवारी झालेल्या मतदान प्रक्रियेत मतदानाचा टक्का घसरला, ज्यामुळे प्रशासनाने व्यापक जनजागृती करण्यामध्ये अपयश साधल्याचे चित्र दिसून आले. कल्याण डोंबिवली मनपाच्या २०२० च्या नगरसेवकांची मुदत संपली होती, आणि कोरोना पार्श्वभूमीवर लागलेल्या प्रशासकीय राजवटीनंतर डिसेंबर २०२५ मध्ये केडीएमसी निवडणुकीसाठी तयारी सुरु झाली. १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. ही निवडणूक पॅनल पद्धतीने प्रथमतः पार पडत असून, १२२ जागांसाठी ३१ पॅनलमधून निवडणूक लढली गेली. डोंबिवलीमधील पॅनल क्रं. २४ मधील चारही उमेदवार बिनविरोध निवडून आले. उर्वरित ३० पॅनलमध्ये ४६८ उमेदवार, राजकीय पक्ष आणि अपक्ष, निवडणूक रिंगणात होते, ज्यामुळे निवडणुकीत रंगतदार व चर्चेची लढत पाहायला मिळाली. प्रचाराच्या रणधुमाळी कालावधीत भाजपा–शिवसेना युतीच्या सभांमुळे बोलबाला दिसून आला, ज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. तर मनसेच्या आमदार भास्कर जाधव आणि राज ठाकरे यांचा दौरा पाहता काही ठिकाणी प्रचारात जोरदार प्रतिस्पर्धा पाहायला मिळाली.

गुरुवारी मतदान प्रक्रिया सकाळपासून कासव गतीने सुरू झाली, ज्यामुळे काही मतदार निरुत्साहित झाले आणि मतदानासाठी पाठ फिरवली. मात्र, दुपारी रांगा लागल्याने मतदानाची टक्केवारी कशीबशी वाढली. मतदारांच्या चर्चेनुसार काही पॅनलमध्ये दुरंगी लढत पाहायला मिळेल, तर काही पॅनलमध्ये अपक्षांच्या बोलबाल्याचा फटका भाजपा–शिवसेना युतीच्या उमेदवारांना बसण्याची शक्यता आहे.

# मतदान यंत्रणेतील गोंधळ ● नाईक कुटुंबाची मतदान केंद्राच्या शोधासाठी एक तास धावपळ



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १५ :**

**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या मतदान दिवशीच वनमंत्री गणेश नाईक आणि त्यांच्या परिवाराला मोठ्या गोंधळाचा सामना करावा लागला. सकाळी ७.३० वाजताच मतदानासाठी घराबाहेर पडलेल्या गणेश नाईक, संजीव नाईक आणि कल्पना नाईक यांना मतदान केंद्राबाबत स्पष्ट माहिती न मिळाल्यामुळे तब्बल एक तास धावपळ सुरू राहिली. अखेर एक तासानंतर त्यांना मतदानाचा हक्क बजावता आला. या सगळ्या धावपळीमुळे वनमंत्री गणेश नाईक यांनी निवडणूक यंत्रणेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले, तसेच निवडणूक यंत्रणा “टू द पॉईंट” काम करत नाही असा आरोप केला. पुढे तपासात असे दिसून आले की, सुरुवातीला गेलेल्या दोन मतदान केंद्रांवर गणेश नाईक व त्यांच्या परिवाराची नावे मतदार यादीत आढळली नाहीत. त्यामुळे मतदान केंद्र बदलावे की मतदार यादीत गोंधळ आहे, याबाबत संभ्रम निर्माण झाला. नाईक परिवाराला वेगवेगळ्या केंद्रांवर चौकशी करत धावपळ करावी लागली.

अखेर कोपरखैरणे येथील सेंट मेरी हायस्कूलमधील मतदान केंद्रावर गणेश नाईक, संजीव नाईक आणि कल्पना नाईक यांची नावे यादीत असल्याचे स्पष्ट झाले आणि त्यानंतर त्यांनी मतदान केले. मात्र, इथेच आणखी गोंधळ समोर आला. नाईक परिवारातील पुतणे तसेच माजी महापौर सागर नाईक आणि त्यांच्या पत्नी यांची नावे एकाच मतदान केंद्रावर नोंदलेली नसून वेगळ्या ठिकाणी होती. त्यामुळे संपूर्ण नाईक परिवाराला यावेळी वेगवेगळ्या केंद्रांवर मतदान करावे लागले.

# भिवंडी महानगरपालिकेच्या मतदानाची हाणामारीने सुरुवात

## मतदारांमध्ये भीतीचे वातावरण मतदारांना केंद्रावर आणण्यासाठी उमेदवार समर्थकांची धावपळ

- **जेष्ठ व वयोवृद्ध नागरिकांना सुलभरित्या मतदान करता यावे यासाठी तळमजल्यावर मतदान केंद्रे असावी,अशा निवडणूक आयोगाच्या सूचना असताना भिवंडीत काही ठिकाणी पहिल्या मजल्यावर देखील मतदान केंद्रे केल्याने जेष्ठ नागरिकांचे हाल झाले.**
- **भिवंडीत संगमपाडा येथील मनपा वसाहती मधील मतदान केंद्रात ईव्हीएम मशीन हँग झाल्याने जेष्ठ नागरिकांना मतदानामध्ये व्यत्यय आला.**
- **भिवंडी महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते शेख खालिद गुड्डू यांना न्यायालयाने परवानगी दिल्याने ते ठाण्याहून भिवंडीत आले.**
- **तर भाजपचे माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी सुध्दा भाजप उमेदवारांची भेट घेत शुभेच्छा दिल्या.**
- **भिवंडीत मतदारांच्या बोटांना लावलेली शाई पुसली जात असल्याने व साबणाने नाहीशी करता येत असल्याचा फायदा घेत अनेकांनी बोगस मतदान केल्याची माहिती राष्ट्रवादी पक्षाचे जेष्ठ नेते कमलाकर टावरे यांनी सांगितले.**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी :** भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज सकाळपासून काही ठिकाणी तणावपूर्ण वातावरणात तर काही ठिकाणी संथगतीने मतदानास सुरुवात झाली.शहरात मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया सुरू होताच कोंबडपाडा व काही ठिकाणी शिवीगाळ हाणामारीचे प्रकार घडल्याने लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे भिवंडी पोलीस उपायुक्त शशिकांत बोराटे, सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन सांगळे, विजय मराठे यांनी पोलीस पथकासह घटनास्थळी धाव घेऊन अधिक बंदोबस्त ठेवून मतदान प्रक्रिया सुरळीत ठेवली.तर काही ठिकाणी मतदारांना पैसे वाटप करीत असताना संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेऊन गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. शहरांमधील नागरिकांच्या समस्यांकडे राजकीय पक्ष उमेदवारांनी लक्ष न दिल्यामुळे मतदार मतदान करण्यासाठी सुद्धा निरउत्साही होते त्यामुळे अनेक ठिकाणी मतदारांना मतदान केंद्रावर आणण्यासाठी राजकीय पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते धावपळ करीत होते.दुपारी 4:30 वाजेपर्यंत अंदाजे 46 %टक्के मतदान झाल्याचे सांगण्यात आले.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता २३ प्रभागात ९० जागांसाठी ४३८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. शिवसेना,भाजप,काँग्रेस,समाजवादी पक्ष,राष्ट्रवादी काँग्रेस (श), मनसे, शिवसेना(ठाकरे),कोणार्क विकास आघाडी,राष्ट्रवादी काँग्रेस (अ),भिवंडी विकास आघाडी व अन्य राजकीय पक्ष तसेच मोठ्या प्रमाणात अपक्ष उमेदवार निवडणूक लढवित असल्याने या पहिल्या दिवसापासून या निवडणुकीला आगळेवेगळे स्वरूप निर्माण झाले आहे. शहरामध्ये ७५० मतदान केंद्रे असून १५३ केंद्रे संवेदनशील असल्याने पोलिसांनी या ठिकाणी बंदोबस्त तैनात केला होता.

शहरातील विविध ठिकाणी असलेल्या मतदान केंद्रावर आज सकाळी ७-३० वाजता मतदानाला सुरुवात झाली. सकाळी कडक ऊन असल्याने दुपारी १-३० वाजेपर्यंत २६.१८% मतदान झाले.शहरातील प्रभाग क्र.१ मधील कोंबडपाडा येथे भाजप व कोणार्क विकास आघाडी समर्थकांमध्ये आज सकाळी व दुपारी मतदान करण्यावरून हाणामारी झाली. तसेच निजामपूर भागात पिलीस्कुल केंद्राजवळ राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस यांच्या कार्यकर्त्यांमध्ये शिवीगाळ, बाचाबाची,हाणामारी झाली. भोईवाडा पोलीस ठाण्याचा हद्दीत देखील काँग्रेस व समाजवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी शिवीगाळ होण्याचे प्रकार घडले आहे.पोलिसांनी अशा घटनास्थळी पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. मात्र या हाणामारी प्रकरणी अद्याप कोणत्याही पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला नसल्याचे पोलिसांनी सांगितले.शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत कल्याणरोड नवी वस्ती येथे पैसे वाटप करताना व बोगस मतदान करताना पोलिसांनी संशयितांना ताब्यात घेतल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक कृष्णदेव खराडे यांनी दिली. तर नारपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत देखील ४ संशयित बोगस मतदारांना ताब्यात घेतल्याची माहिती पोलिसांनीं दिली.

दरम्यान भिवंडी महापालिका आयुक्तअनमोल सागर,पोलीस उपायुक्त शशिकांत बोराटे यांनी आपल्या अधिकाऱ्या समवेत अवचितपाडा व दांडेकरवाडी येथील मॉडेल बूथवर भेट दिली तसेच शांतीनगर रोड येथील केंद्र क्र. २२ व ६२ महिला सखी (पिंक) ला भेट दिली.



ठाणे ■ शुक्रवार
१६ जानेवारी २०२६
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता



# पोलिंग एजंट उमेदवारांचा बिल्ला लावून मतदान केंद्रावर बसल्याचा प्रकार : मनसे पदाधिकाऱ्याचा खुलासा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता/ ठाणे:** मुंबईला लागून असलेल्या मीरारोड-भाईंदर महापालिकेसाठी आज मतदान होत आहे. तब्बल ९ वर्षांनी शहरात मतदान संपन्न होत आहे. भाजपसमोर सत्ता टिकवण्याचं आव्हान आहे. शहरात मतदान सुरु असताना काही ठिकाणी वाद होताना दिसत आहे. भाजपचे पोलिंग एजंट उमेदवाराच्या नावाचा बिल्ला लावून मतदान केंद्रात बसल्याचा धक्कादायक प्रकार मनसेच्या पदाधिकाऱ्यानं उजेडात आणला आहे. मनसेच्या पदाधिकाऱ्यानं मतदान केंद्रावरुन फेसबुक लाईव्ह या सगळा प्रकार समोर आणला. मीरारोडमध्ये मतदान केंद्रावर भाजपचे पोलिंग एजंट त्यांच्या उमेदवाराचा नावाचा बिल्ला लावून बसले होते. हा प्रकार समजताच मनसेचा पदाधिकारी तिथे पोहोचला. त्यानं वेगवेगळया बूथवर जाऊन तपासणी केली. तेव्हा अनेक बूथवर भाजपचे पोलिंग एजंट त्यांच्या उमेदवारांच्या नावांचा बिल्ला लावून बसलेले दिसले. मतदानाच्या नियमानुसार हा प्रकार बेकायदेशीर असल्याची बाब मनसेच्या पदाधिकाऱ्यानं पोलिसांच्या, निवडणूक अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून दिली. पण कोणतीही कारवाई न झाल्यानं त्यानं संताप व्यक्त केला. मनसेच्या पदाधिकाऱ्यानं मतदान केंद्रावरील सगळयाच बूथवर जाऊन तपासणी केली. तेव्हा भाजपचे अनेक पोलिंग एजंट उमेदवारांचं नाव असलेला बिल्ला लावून बसलेले दिसले. मनसेच्या पदाधिकाऱ्यानं यावर आक्षेप घेतला. सगळया पोलिंग एजंटला बिल्ले काढायला लावले. तुम्ही या लोकांना परवानगी कशी काय दिली, अशी विचारणा मनसेच्या पदाधिकाऱ्यानं निवडणूक अधिकाऱ्यांकडे केली. पण त्यांच्याकडेही उत्तर नव्हतं.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024